परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अंतर्गत "शासनाच्या अंशदानात" वाढ करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१९/प्र.क्र.२६६/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ ऑगस्ट २०१९.

**संदर्भ :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२७.८.२०१४.
३) केंद्र शासनाचे अधिसूचना क्रमांक : फा.सं.१/३/२०१६-पीआर, दि.३१.१.२०१९.

**प्रस्तावना**

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयानुसार दि.१.११.२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये स्तर-१ अंतर्गत प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या "मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता" या रक्कमेच्या १० टक्के इतके मासिक अंशदान द्यावे लागेल. राज्य शासन सममुल्य अंशदान देईल अशी तरतूद आहे.

२. संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्यात आली आहे.

३. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील अधिसूचनेन्वये केंद्रीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत 'नियोक्त्याचे अंशदान' वर्गणीदार कर्मचाऱ्याच्या वेतन आणि महागाई भत्त्याच्या १४% करण्यात आले आहे.

४. केंद्र शासनाच्या वरील निर्णयाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेतील वर्गणीदार अधिकारी / कर्मचाऱ्यांच्याबाबतीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या "नियोक्त्याच्या अंशदानामध्ये" वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, दि.१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत "कर्मचाऱ्यांचे अंशदान" म्हणून वर्गणीदाराचे "मूळ वेतन अधिक महागाई भत्ता" या रक्कमेच्या १० टक्के इतके मासिक अंशदान कपात केले जाईल. सदर खात्यामध्ये यापुढे राज्य शासन "नियोक्त्याचे अंशदान" म्हणून "वर्गणीदाराचे मूळ वेतन अधिक महागाई भत्ता" या रक्कमेच्या १४ टक्के इतके मासिक अंशदान देईल.

शासनाच्या अंशदानामध्ये करण्यात आलेली वाढ दि.१ एप्रिल २०१९ पासून देय राहील. माहे एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ च्या थकबाकी रक्कमेसह माहे ऑगस्ट २०१९ च्या सप्टेंबर २०१९ मध्ये देय वेतन देयकाद्वारे वाढीव शासन अंशदान कपातीची कार्यवाही सुरु करण्यात यावी.

२. सदर निर्णय मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे इत्यादीच्या सेवेमध्ये दि.१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असा आदेश देत आहे की, जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना सदर आदेश लागू राहतील.

४. यासंबंधीचा खर्च शासनाचा अंशदान ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील खर्च भागविण्यासाठी विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०८१९११४५५४२९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.08.19 12:02:45 +05'30'

**( इंद्रजित सं.गोरे )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.
१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.

४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५९) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६०) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६१) निवड नस्ती.
* पत्राद्वारे.

To increase "Government°s Contribution" under Defined Contribution Pension Scheme / National Pension Scheme.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

Finance Department

**Government Resolution No. : CPS-2019/C.R. 266/SER -4**

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai- 400032.
Date : 19 August 2019.

**Reference :**
1) Government Resolution, Finance Department No. CPS-1005/126/SER-4, dated 31.10.2005.
2) Government Resolution, Finance Department No. CPS-2012/C.R.96/ SER-4, dated 27.08.2014.
3) Ministry of Finance Notification No.F.No.1/3/2016-PR, dated 31.01.2019.

**INTRODUCTION**

"Defined Contribution Pension Scheme" is made applicable to the employees recruited in government service on or after 01.11.2005, according to Government Resolution at Sr.No.1. In this scheme subscriber Government servant, as employee's contribution, will have to pay a monthly contribution at 10% of his "Basic Pay plus Dearness Pay (if any) plus Dearness Allowance". The State Government, as employer's share is paying an equal matching contribution.

2. According to Government Resolution at Sr. No.2 "Defined Contribution Pension Scheme (DCPS)" of the State Government was merged with "National Pension Scheme (NPS)" of the Government of India.

3. According to Notification of Ministry of Finance at Sr. No.3, above the monthly contribution of the employer has been increased from 10 to 14 per cent of the Basic Pay plus Dearness Allowance payable to the employee.

4. The question of increasing Government's contribution under Defined Contribution Pension Scheme / National Pension Scheme with respect to State Government employees was under consideration of the State Government.

**GOVERNMENT RESOLUTION**

Government is now pleased to take decision with respect to Defined Contribution Pension Scheme / National Pension Scheme applicable to the employees recruited in government service on or after 01.11.2005. The "Employee's Contribution" will be deducted at 10% of the Basic Pay plus Dearness Allowance payable to the subscriber. Hereby government as "Employer's Contribution" will pay at 14% of the Basic Pay plus Dearness Allowance payable to the subscriber. This increase in Government share shall come into force with effective from 1st April 2019. Actual benefit of the same

with arrears from April 2019 to July 2019 would be paid from the salary of August 2019 to be paid in the month of September 2019.

2. The above decision should, mutatis-mutandis, apply to the employees, who are recruited on or after 1st November 2005, in the services of the Recognized and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities etc.

3. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, it has been further decided that the above decisions shall apply to the employees of Zilla Parishads.

4. The expenditure on this account shall be debited to the Budget Heads to which the Government Contribution mentioned in the above paras are usually debited and shall be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, concerned Administrative Department of Mantralaya shall take necessary steps to present Supplementary Demands in the ensuing session of the Legislature to cover expenditure to be incurred in respect of above expenditure.

5. This Government Resolution is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 201908191145542905. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPUTY SECRETARY
Date: 2019.08.19 12:03:04 +05'30'

**(Indrajeet S. Gore)**
**Deputy Secretary to Government.**